

गोष्टीरूप
कृष्णकन्हैय्या
मानसी काणे
परी
प्रकाशन






गोष्टीरूप कृष्णकन्हैय्या



© सुरक्षित



**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८–ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.


**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८–ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३


**किंमत :**
रुपये १००/-



# अनुक्रमणिका


१. कृष्णजन्म .................... ५
२. महाबळ भटाची फजिती ...... ११
३. पुतनेचा वध .................. १२
४. शकटासुराचा वध ............. १४
५. तृणासुराचा वध .............. १५
६. कृष्णाच्या बाललीला ......... १६
७. नलकूवर आणि मणिग्रीवाचा उद्धार १९
८. वृंदावनातला काळ ............ २२
९. ब्रह्मदेवाचे गर्वहरण ............ २५
१०. धेनुकासुराचा वध ............. २७
११. कालियामर्दन ................. २८
१२. प्रलंबासुराचा वध ............. ३१
१३. मुनीपत्नींवर कृपा ............. ३३
१४. नंदाची सुटका ................ ३५
१५. शंखचूडाचा वध ............... ३६
१६. अरिष्टासुराचा वध ............. ३७
१७. व्योमासुराचा वध ............. ३८
१८. अक्रूराचे वृंदावनात आगमन ... ३९
१९. कृष्ण, बलरामाचे मथुरेत आगमन ४१
२०. मथुरेतील लीला .............. ४३
२१. कंसाचा वध आणि... ........ ४५
२२. रासलीला .................... ४७
२३. राधा ........................ ४९
२४. गोवर्धन पर्वताची पूजा ......... ४९
२५. सांदिपनी आश्रमात श्रीकृष्ण.... ५४
२६. उद्धवाकडून गोकुळवासियांचे... ५७
२७. जरासंधाचा पराभव ........... ६०
२८. कालयवनाचा अंत ............ ६२
२९. श्रीकृष्णाची द्वारका ........... ६४
३०. श्रीकृष्णाकडून पांडवांची चौकशी ६५
३१. रुक्मिणी स्वयंवर .............. ६६
३२. स्यमंतक मण्याची कथा ....... ६९
३३. प्रद्युम्नाची कथा ............. ७१
३४. सुदामा आणि श्रीकृष्ण यांची भेट ७३
३५. नरकासुराचा वध .............. ७६
३६. सत्यभामेचे नारदांना कृष्णदान .. ७८
३७. बाणासुराशी युद्ध ............. ८१
३८. नृगराजाचा उद्धार ............. ८३
३९. मारुती–श्रीकृष्ण भेट आणि... ८५
४०. जरासंधाचा वध .............. ८७
४१. राजसूय यज्ञ .................... ८९
४२. शिशुपालाचा वध ............. ९१
४३. द्रौपदी वस्त्रहरण ............... ९५
४४. शाल्व वध .................... ९७
४५. दंतवक्र आणि विदूरथाचा वध .. ९९
४६. श्रीकृष्णाची कुरुक्षेत्र यात्रा ..... १०१
४७. कृष्णाचे विठ्ठलरूप .......... १०२
४८. सुभद्राहरण .................... १०४
४९. खांडववन दहन ............... १०५
५०. कृष्ण, अर्जुन आणि दुर्योधन भेट १०९
५१. संजय शिष्टाई ................. १११
५२. पांडवांचे प्रस्ताव .............. ११२
५३. कृष्णाचे हस्तिनापुरास प्रयाण... ११४
५४. श्रीमदभगवद्गीता ............ ११९
५५. जयद्रथ वध ................... १२१
५६. कर्ण वध ..................... १२३
५७. अश्वत्थाम्याला शासन ........ १२६
५८. धृतराष्ट्राच्या क्रोधापासून... .... १२८
५९. उत्तरेच्या पुत्रास जीवदान ....... १३०
६०. श्रीकृष्णाचा अंत आणि... ..... १३१







# गोष्टीरूप कृष्णकन्हैय्या



## कृष्णजन्म


युगानयुगांपूर्वीची गोष्ट आहे ही. दैत्यांच्या दुराचरणाने आणि अत्याचारांमुळे पृथ्वी त्रस्त झाली होती. अखेर गाईचे रूप घेऊन ती ब्रह्मदेवांकडे गेली. तिने आपले दु:ख त्यांना सांगितले. मग ब्रह्मा तिला आणि सर्व देवांना घेऊन क्षीरसमुद्राच्या तीरावर गेले आणि त्या सर्वांनी श्रीविष्णूंची आराधना केली.

''हे पुराणपुरुषा, दीनरक्षका, आदिनारायणा, पृथ्वीवर दैत्यांनी मोठा अनर्थ मांडला आहे. त्यामुळे पृथ्वी अगदी गांजून गेली आहे. हे दयार्णवा, हे संकट तूच नाहीसे करू शकतोस.''

विष्णू प्रसन्न झाले. क्षीरसागरातून आकाशवाणी झाली. ''हे ब्रह्मदेव, मी सर्व जाणतो. म्हणूनच दुष्टांच्या संहारासाठी मी वसुदेवाच्या पोटी जन्म घेणार आहे. त्याआधी शेष बलरामाचा अवतार घेईल. रामावतारात धाकटा भाऊ होऊन त्याने माझ्याबरोबर वनवास सहन केला आहे आणि माझी सेवा केली आहे.. पण या जन्मी त्याचा धाकटा भाऊ होऊन मी त्याची सेवा करीन. बृहस्पतीने द्रोण होऊन पांडवांना विद्या शिकवावी. आपण सर्व देवांनी आणि देवस्त्रियांनी यदुकुलात आपापल्या अंशाने यादवांच्या आणि गोपींच्या रूपात अवतार घ्यावा.'' विष्णूची आज्ञा शिरसावंद्य मानून ब्रह्मांनी पृथ्वीची समजूत घातली. भगवंतांचा जयजयकार करीत सर्व आपापल्या लोकात निघून गेले.

यावेळी गोकुळात शूरसेन नावाच्या यादवराजाला पुत्र झाला. त्याचे नाव ठेवले वसुदेव. तो फार गुणी आणि सुस्वरूप होता. मोठा झाल्यावर त्याचा विवाह मथुरेचा राजा उग्रसेन याची कन्या देवकी हिच्याबरोबर ठरला. उग्रसेनाचा मुलगा कंस फार दुष्ट आणि राक्षसी प्रवृत्तीचा होता. उग्रसेनाला बाजूला करून तोच मथुरेचे राज्य करीत होता. राजाने आपल्या मुलीचे लग्न मोठ्या थाटामाटात करून दिले. वसुदेव आणि देवकीची वरात निघाली. वधुवरांना हिरे, माणके, रत्ने यांनी सजविलेल्या सुंदर सुवर्ण रथात बसवून मिरवणूक निघाली होती. मंगल वाद्ये वाजत होती. वरातीसमोर शृंगारलेली हत्ती घोड्यांची पथके झुलत होती. कंस स्वत: सारथी बनला होता. सर्वत्र रोषणाई केली होती. वरातीपुढे अप्रतिम दारूकाम होत होते आणि त्याच्या प्रकाशात आकाशातून जणू चांदण्यांचा वर्षाव होत असल्याचा भास होत होता. सगळेच मोठ्या आनंदात होते. इतक्यात अचानकपणे आकाशवाणी झाली,

''हे कंसा, तू फार उन्मत्त झाला आहेस. जनतेवर अत्याचार करतो आहेस. प्रजेला फसविण्यासाठी हे वरातीच्या थाटामाटाचे नाटक करतो आहेस; पण लक्षात ठेव, या देवकीचा आठवा पुत्र तुझा वध करील.''हे ऐकताच कंस संतापला. रथातून उडी टाकून त्याने देवकीची वेणी धरून तिला खाली ओढले आणि तिला ठार मारण्यासाठी तलवार उपसली.



देवकी म्हणाली, ''दादा, कळीकाळालाही न घाबरणारा तू या आकाशवाणीला काय घाबरतोस ? बंधुराया, मला मारू नकोस.''

उग्रसेन पुढे येऊन म्हणाला, ''पुत्रा, आपल्या बहिणीची तू ही काय स्थिती केलीस ?'' सर्वजण घाबरले. वरातीवर दु:खाची छाया पसरली.

इतक्यात वसुदेव खाली उतरला आणि म्हणाला, ''कंसा, स्त्रीवध करू नकोस. ते पाप आहे.''

यावर संतापाने कंस म्हणाला, ''हिचा भावी पुत्र जर माझ्या मरणाचे कारण असेल तर मी हिला का जिवंत ठेवावे ?''

यावर वसुदेवाने कंसाला आश्वासन दिले की, ''देवकीला होणारे पुत्र मी तुझ्या स्वाधीन करीन.'' मग कंसाने तलवार म्यानात टाकली आणि आपल्या सैनिकांना आज्ञा केली,

''अरे, या वसुदेव-देवकीला तुरुंगात टाका आणि त्यांच्यावर कडक पहारा ठेवा.'' विवाहसोहळ्याचा बेरंग झाला आणि वसुदेव देवकीला बंदिवासात ठेवण्यात आले.

काही काळानंतर देवकी गर्भवती राहिली. कंसाचा पहारा आणखी कडक झाला. दिवस पूर्ण होताच देवकीने एका गोजिरवाण्या मुलाला जन्म दिला. बाळाला पाहून वसुदेव आणि देवकी दु:खाने म्हणाले, ''बाळा, कशाला रे जन्माला आलास ? तुझ्या जन्माआधीच तुझे मरण निश्चित झाले आहे.'' कंसाला दिलेल्या वचनाप्रमाणे वसुदेवाने हे बाळ कंसाला दिले. त्या सुंदर बाळाला पाहून कंसाच्या मनात प्रेम निर्माण झाले. नाहीतरी देवकीच्या आठव्या मुलाकडून आपल्याला मरण आहे. मग याला कशाला मारायचं ? असा विचार करून त्याने ते बाळ वसुदेवाकडे परत दिले. मुलगा जिवंत परत मिळाल्यामुळे देवकीला फार आनंद झाला.

इकडे इंद्राच्या सांगण्यावरून नारदमुनी कंसाकडे गेले आणि म्हणाले, ''कंसा, अरे उलटीकडून मोजलंस तर देवकीचा हा पुत्रसुद्धा तुझा काळ ठरू शकतो. कदाचित देवकीची सगळी मुलं तुझी शत्रू असू शकतील.''

कंस संभ्रमात पडला. म्हणाला, ''मुनिवर्य, आपण म्हणता ते खरं आहे. मी आत्ताच जातो आणि त्या देवकीपुत्राला ठार करतो. यालाच नाही तर देवकीच्या सगळ्याच मुलांना मी स्वर्गाची वाट दाखवीन.'' नारदमुनींचे काम झाले. कंसाच्या हातून बालहत्येचे पातक घडेल आणि मग श्रीविष्णू देवकीच्या पोटी लवकर जन्म घेतील असे इंद्राला वाटले. नारद निघून जाताच  कंस बंदीशाळेत गेला. त्याला पाहून वसुदेव आणि देवकी घाबरून गेले. नवजात बालक आईचे दूध पीत होते; पण कंसाने देवकीकडून मूल ओढून घेतले आणि त्याला गरगर फिरवून शिळेवर आपटून ठार मारले. अशा तऱ्हेने कंसाने देवकीचे सहा पुत्र ठार मारले. कंसाची पापे अतोनात वाढली.

मग श्रीविष्णू शेषाला म्हणाले, ''शेषा, आपण मथुरेत अवतार घेण्याची वेळ आली आहे. तू देवकीच्या उदरात गर्भरूपानं राहा. मी योगमायेकडून तुझा गर्भ देवकीच्या उदरातून रोहिणीच्या उदरात ठेवीन.''

देवकी सातव्या वेळी गर्भवती झाली. विष्णूंच्या आज्ञेनुसार सातव्या महिन्यात तो गर्भ योगमायेनं गोकुळात राहणाऱ्या वसुदेवाच्या दुसऱ्या पत्नीच्या रोहिणीच्या उदरात ठेवला. इकडे बंदिशाळेच्या रक्षकांनी देवकीचा गर्भ नष्ट झाल्याचे वर्तमान कंसाला सांगितले. कंसाने परिस्थिती पाहिली. गोकुळात आकाशवाणी झाली की, ''रोहिणीच्या पोटी वाढणारा पुत्र वसुदेवाचा असून प्रत्यक्ष शेषाने अवतार घेतला आहे.'' हे ऐकून सर्वांना आनंद झाला. दिवस पूर्ण होताच रोहिणीने एका सुंदर मुलाला जन्म दिला.. नंदानं मोठा जन्मोत्सव केला. त्याचे नाव बलराम असे ठेवले. थोड्याच दिवसात नंदाची पत्नी यशोदेला डोहाळे लागले. इकडे देवकी गर्भवती झाली. प्रत्यक्ष भगवान विष्णू तिच्या उदरात वाढत होते. तिचे शरीर दिव्य तेजाने झळकू लागले.

वसुदेव तिला म्हणाला, ''देवकी, तुझ्या या आठव्या पुत्राचा घात करण्यासाठी कंस सरसावून बसला आहे. तरीही तुला काही काळजी कशी वाटत नाही ?''

यावर देवकीच्या मुखातून विष्णू म्हणाले, ''मी दैत्यांचा संहार करीन. कंसाची बंदिशाळा फोडून सर्वांची मुक्तता करीन.''


देवकीचे बोलणे ऐकून वसुदेवाला आनंद झाला; पण तो म्हणाला, ''देवकी, तुझे बोलणे रक्षकांनी ऐकले तर अनर्थ होईल.''

हे ऐकून विष्णू वसुदेवासमोर प्रकट झाले आणि म्हणाले, ''मी तुमच्या पोटी अवतार धारण केला आहे. तुम्ही जन्मताच मला गोकुळात नंदाच्या घरी ठेवा आणि यशोदेच्या पोटी जन्मलेल्या मुलीला इथे आणून ठेवा.'' एवढे सांगून विष्णू पुन्हा गर्भरूपात देवकीच्या उदरी गेले. पावसाळ्याचे दिवस. श्रावण वद्य अष्टमी. पाऊस धो धो कोसळत होता. बाहेर भयानक अंधार पसरला होता; पण याच वेळी वसुदेव आणि देवकीचे कारागृह दिव्य प्रकाशाने भरले होते. देवकीने एका सुंदर आणि तेजस्वी मुलाला जन्म दिला होता.

त्या नवजात बालकाकडे पाहताच वसुदेव देवकीला शंख, चक्र, गदा, पद्म धारण केलेले प्रत्यक्ष श्रीविष्णूंचे चतुर्भुज स्वरूप दिसले. दोघांचे भान हरपले; पण क्षणभरातच त्यांची समाधी उतरली आणि या बाळाच्या हत्येचे भय त्यांच्यापुढे उभे ठाकले. त्यांनी हात जोडले. यावेळी विष्णू म्हणाले, ''वसुदेवा, पूर्वजन्मी तू सुतपा आणि देवकी पृश्नी होती. पुत्रप्राप्तीसाठी तुम्ही तप केले होते. त्यामुळे प्रसन्न होऊन मी वर मागण्यास सांगितले. तू म्हणालास, 'देवा, तूच माझा पुत्र व्हावा. तूच माझ्या कुशीत यावेस, माझ्या तपाचे फळ म्हणून तूच मला पुत्ररूपाने मिळावास.' एकच इच्छा तू तीन प्रकारे बोलून दाखवलीस म्हणून मी तुझ्या पोटी पृश्नीगर्भ या नावाने जन्मास आलो.

त्यानंतरच्या जन्मात तुम्ही आदिती आणि कश्यप मुनींच्या जन्मात आलात. त्यावेळी मी उपेंद्र नावाने तुमच्या पोटी जन्माला आलो. या जन्मात तुम्ही वसुदेव आणि देवकी म्हणून जन्माला आलात आणि दिलेल्या वराप्रमाणे मी तुमच्या पोटी जन्माला आलो. माते, तात हा तुमचा शेवटचा जन्म आहे. यानंतर तुम्हाला मोक्ष मिळेल आणि तुम्ही माझ्यात विलीन व्हाल. आता मला ताबडतोब गोकुळात घेऊन जा. तिथं यशोदेच्या पोटी आदिमायेने नुकताच जन्म घेतला आहे. मला तिच्या जागी ठेवून त्या कन्येला घेऊन ये.''

वसुदेवाने बाळाला गुंडाळून एका वेताच्या टोपलीत ठेवले. ईश्वराचा नवा अवतार पाहण्यासाठी आकाशात देवांनी गर्दी केली. त्यांनी बाळावर पुष्पवृष्टी केली. प्रत्यक्ष परमात्मा आपल्या पोटी आला असल्याने आता भीती कसली असा विचार करून वसुदेवाने टोपली डोक्यावर घेतली. त्याच्या हातापायात नवचैतन्य निर्माण झाले. त्याच्या पायातल्या बेड्या आपोआप गळून पडल्या. पुढे जाताच तुरुंगाचे दरवाजे उघडले. पहारेकरी गाढ झोपी गेले. वसुदेव बाळाला घेऊन बाहेर पडला. पाऊस मी म्हणत होता. यमुना दुथडी भरून वाहत होती. बाळाचे पावसापासून रक्षण करण्यासाठी शेषनागाने आपल्या फण्याचे छत्र त्याच्या डोक्यावर धरले. वसुदेव यमुनेच्या प्रवाहात शिरला. पाणी त्याच्या गळ्यापर्यंत आले आणि काय आश्चर्य !



बाळाच्या पायाचा अंगठा पाण्यास लागताच यमुना दुभंगली आणि एक पायवाट तयार झाली. वसुदेव बाळाला घेऊन नंदाघरी सुखरूप पोहोचला. गोकुळ गाढ निद्रेत होते. नंदाच्या अंतर्गृहात प्रवेश करून वसुदेवाने बाळाला यशोदेच्या कुशीत ठेवले आणि तिच्याजवळची कन्या घेऊन तो परत मथुरेत आला. तो आत येताच तुरुंगाचे दरवाजे पुन्हा बंद झाले. त्याने कन्येस देवकीच्या कुशीत ठेवले. वसुदेवाच्या हातीपायी पुन्हा बेड्या पडल्या. जणू काही घडलेच नाही असे सर्व झाले. देवकीच्या कुशीतली कन्या किंचाळली. पहारेकऱ्यांनी कंसाला देवकी प्रसूत झाल्याची वार्ता दिली. त्याबरोबर तो धावतच बंदिशाळेत आला. देवकीच्या हातातून त्याने मुलीला हिसकावून घेतले. गरगर फिरवून तिला शिळेवर आपटणार तोच ती त्याच्या हातातून निसटली आणि विजेसारखी कडकडत आकाशात गेली आणि आकाशवाणीने कंसाला म्हणाली,

''कंसा, तुझा शत्रू जन्माला आला आहे आणि सुखरूप आहे. तो तुझ्या कोणत्याही उपायांनी मरणार नाही.'' हे ऐकताच कंसाच्या जिवाचा थरकाप झाला. खिन्न मनाने तो तिथून निघून गेला.

नंदाने बाळाचे जातकर्म करून हजारो गाई, वस्त्रालंकार, तिळाच्या सात राशी असा मोठा दानधर्म केला. छोटा कृष्ण यशोदेच्या कुशीत निजला होता. यशोदा त्याला न्याहाळत होती. त्याचे मनोहर रूप डोळ्यात साठवून घेत होती. इतक्यात बाळ जागे झाले आणि आईकडे पाहून हसू लागले. त्याने आपल्या उजव्या पायाचा अंगठा आपल्या मुखात घातला आणि चोखू लागला. नंदाच्या बाळाचे जातक वर्तवण्यासाठी कुलगुरू गर्ग मुनींना पाचारण केले. बालकाचा हात पाहून आणि जन्मवेळ पाहून गर्गमुनी म्हणाले, ''नंद, यशोदे, तुमचे भाग्य थोर आहे. प्रत्यक्ष भगवान श्रीविष्णू तुमच्या घरी अवतरले आहेत. या मुलाची कीर्ती त्रैलोक्यात पसरेल.'' भविष्य ऐकून सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली.

प्रत्यक्ष श्रीविष्णूंचा अवतार असणाऱ्या श्रीकृष्णाच्या वास्तव्यामुळे गोकुळाची भरभराट होऊ लागली. इकडे मथुरेत, ''तुझा शत्रू सुखरूप आहे.'' या आदिमायेच्या सांगण्यामुळे कंस मात्र बेचैन झाला. त्याला ध्यानी, मनी, स्वप्नी देवकीचा आठवा पुत्र दिसू लागला. एकदा राजसभेत त्याचा मुकुट खाली पडला. त्याच्या छत्राचा दांडा मोडून ते खाली कोसळले. ही दुश्चिन्हे पाहून तो घाबरला. आपण घेतलेले सर्व परिश्रम वाया गेले. दैवी शक्ती आपल्यापेक्षा वरचढ ठरली. आपण केलेल्या अनाचारामुळे आपला शेवट लवकरच होणार या विचारांनी त्याला ग्रासले. त्याच्या मनात पश्चात्तापाची भावना निर्माण झाली. वासुदेव-देवकीकडे जाऊन त्याने त्यांची क्षमा मागितली. कंसाचा हा पश्चात्ताप खरा की खोटा तोच जाणे; पण त्याने वसुदेव देवकीला मुक्त केले आणि त्यांच्या घरी परत पाठवले. हे सगळे करून कंस आपल्या राजवाड्यात परत आला. मग त्याने आपल्या मंत्र्यांना बोलावून घेतले. त्यांना सगळा वृत्तांत सांगितला. कंसाचे मंत्रीसुद्धा त्याच्यासारखेच दुष्ट आणि उथळ बुद्धीचे होते. त्यांनी कंसाच्या पराक्रमाची उगीचच